Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२-ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.म./परीक्षा-३/१५३२
पुणे ४११००४
दिनांक -१८/०४/२०२४

प्रति

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय - इ. १०वी व इ. १२वी परीक्षेस शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता नसलेला विषय खाजगीरित्या अध्ययन करुन स्वत:च्या जबाबदारीवर विद्यार्थ्यास प्रविष्ट होण्याची परवानगी देण्याबाबतच्या सध्याच्या धोरणात सुधारणा करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन सूचित करण्यात येते की, इ. १०वी व इ. १२वी परीक्षेस शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता नसलेला विषय खाजगीरित्या अध्ययन करुन स्वत:च्या जबाबदारीवर विद्यार्थ्यास प्रविष्ट होण्याची परवानगी देण्याबाबतच्या सध्याच्या धोरणात सुधारणा करणेच्या अनुषंगाने ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विषय अध्यापनाची सोय नाही, अशा विषयांना खाजगीरित्या अध्ययन करण्याबाबतचा विषय दिनांक ०१/११/२०२३ रोजीच्या कार्यकारी परिषदेत सादर केला असता खालील शिफारशीनुसार ठराव संमत झाला आहे -

१ सद्यस्थितीत दि. ०१/१०/१९९४ व दि. ३०/०१/२००६ च्या कार्यकारी परिषदेच्या ठरावानुसार कार्यवाही सुरु आहे, ती कायम ठेवण्यात यावी.
२ विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत इतर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विषय शिकवला जात असेल तरच परवानगी देण्यात यावी याबाबत सभेमध्ये चर्चा होऊन, अशी अट ठेवता येणार नाही, असे ठरले.
३ तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मुल्यमापनाची जबाबदारी संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयावर सोपवावी, तसे हमीपत्र प्रस्तावासोबतच घ्यावे.
४ अशा विषयांना परवानगी घेण्यासाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ ऑगस्टपूर्वी प्रस्ताव पाठवून विभागीय मंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
५ सदर प्रस्तावांसोबत प्रति विद्यार्थी रु. २०००/- इतके शुल्क आकारणी करावी.

तरी उपरोक्त ठरावाची नोंद घेऊन सदर बाब परिपत्रकान्वये सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावी व फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेपासून प्रस्तावित शुल्क आकारुन यथानियम कार्यवाही करण्यात यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे - ०४.

क्र.पु.वि.मं./शाखा-'अ'/2346
पुणे-४११००५
दि.२३/०४/२०२४
26

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय / शाळा
जिल्हा-पुणे /अहमदनगर /सोलापूर,

उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांनी व शाळांनी आपल्या सूचना फलकावर लावून विद्यार्थी व पालकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

( औदुंबर उकिरडे )
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,पुणे